# WOMEN EMPOWERMENT:

## Role in Social Science

**Chief Editor**

Dr. S.V. Kshirsagar

Dr. S.B. Donge

Dr. C.B. Satpute

Dr. S.U. Kalme

Mr. K.B. Giri

ISBN No. 978-93-83995-66-1

Anuradha Publications, Nanded

# Women Empowerment: Role in Social Science

**Chief Editor**

Dr. S.V. Kshirsagar

Dr. S.B. Donge

Dr. S.U. Kalme

Mr. K.B. Giri

**ISBN No.** 978-93-83995-66-1

**Published by:**

Anuradha Publications

Cidco-Nanded

**Publication Year:** 2019-20

**Price-** Rs. 100/-

**Copyright © ACS College, Gangakhed**

**Printed by**

Gurukrupa Offset,

Near Police Station, Gangakhed

**Typesetting by:**

Simran Computers

Gangakhed Dist.Parbhani

**Cover Designby:**

Mr. Imran K. Mohammad

## CONTENTS


| Sr. No. | Content |
|---|---|
| 01 | स्त्री तत्त्वज्ञ : संत जनाबाई<br>प्रा.डॉ.सचिन खोकले |
| 02 | परळी तालुक्यातील अनुसूचित जातीच्या लोकसंख्या वितरणाचा भौगोलिक अभ्यास<br>डॉ.व्ही.एस.चिमनगुंडे |
| 03 | भारतातील महिला सक्षमीकरणाची वास्तव व गरज एक अभ्यास<br>डॉ. दर्शना साहेबराव कानवटे, प्रा.डॉ.दयानंद उजळंबे |
| 04 | आदिम धर्म अस्तित्व आणि आव्हाने<br>प्रा. राजेश धनचकर |
| 05 | Representation of Social Reality in the Play 'Silence! The Court Is In Session` of Vijay Tendulkar<br>Mr. Kailas B. Giri |
| 06 | महात्मा फुले यांचे सामाजिक योगदान.<br>प्रा.डा. दिपमाला विशनाथ रायठक |
| 07 | घुमंतू बंजारा समाज की संस्कृति<br>प्रा.डॉ. महावीर रामजी हाके |
| 08 | Portrayal of Caste Discrimination in the Works of Mahatma Phule<br>Mr .Kailas B Giri |
| 09 | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील समाजजीवन<br>डॉ. राजेश धनजकर |
| 10 | स्त्री-सक्षमीकरणाच्या विविध योजना<br>प्रा.डॉ.सचिन खोकले |
| 11 | गोदाकाठची भक्तिगंगा संत जनाबाई<br>प्रा.राजेश भालेराव |

# अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील समाजजीवन

डॉ. राजेश धनजकर
कला, वाणिज्य एवं विज्ञान महाविद्यालय,
गंगाखेड जि. परभणी
मो.नं. 9673661693

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जन्म् 1 ऑगस्ट 1920 रोजी भाऊराव व वालुबाई यांच्या पोटी झाला. सांगली जिल्हयातील वाटेगांव हे त्यांचे मूळ गाव. त्या काळच्या जाती प्रथेनुसार अण्णांचा जन्म् मातंग (मांग) जातीत झाला होता. ज्या ठिकाणी मातंग समाजाच्या झोपडया असायच्या त्यालाच 'मांगवाडा' म्हटले जाई. अण्णांचा मांगवाडा वाटेगावच्या पूर्व दिशेला दोन फर्लांगवर होता. "वाटेगावच्या मांगवाडयात मांगांच्या सुमारे शंभर झोपडया त्या काळी होत्या."1 अण्णाभाऊंचा जन्म् त्यातीलच एका झोपडीत झाला, की जी झोपडी बाराही महिने दारिद्रयाने शिगोशिग भरलेली असायची. त्यामुळे भाऊराव व वालुबाईंना चार - चार दिवस उपवास पडायचा. तरीही त्यांच्यात जीवन जगण्याची धडपड ही होतीच. जीवनाचा त्यांना उबगही आलेला नव्हता व त्यांनी हारही मानलेली नव्हती. लहान - सहान काम करणे, चऱ्हाटं व दोरखंड तयार करून विकणे व त्यावरच उदरनिर्वाह भागविणे हा त्यांचा दिनक्रम होता.

तशी अण्णाभाऊंची जात त्या काळी 'शुद्र' म्हणूनच गणली जात होती. त्यामुळे अण्णांच्या कुटुंबाला आपल्या पायरीप्रमाणे राहावे लागत होते. शिवाय त्यांच्याकडे उत्पन्नांचे फारसे साधनही नव्हते. त्यामुळे रोजच रोजी - रोटीचा प्रश्न निर्माण व्हायचा. जिथे भाजी - भाकरीचा प्रश्न 'आ' वासून उभा आहे, तिथे शिक्षण घेवून सुसंस्कृत होणे दुरापास्त होते. हे जरी सगळे ठीक असले तरी अण्णाभाऊंच्या शिक्षणाच्या संदर्भात अलीकडे अनेक मतप्रवाह दिसून येतात. कुणी म्हणतो की, अण्णा दीड दिवस शाळेत गेले, तर काही जण त्यांना दुसरी व सातवीच्या वर्गात नेऊन बसवतात. खरे तर अण्णाभाऊंनी कोणत्या इयत्तेत शिक्षण घेतले हे इथे मुळीच महत्वाचे नाही. तर त्यांच्यासाठी हे उघडे जगच शिक्षणाचे विद्यापीठ ठरले होते. अण्णांची जडणघडण इथेच झाली. त्यांच्या प्रतिभेला इथेच धुमारे फुटले. कुठल्याही प्रकारचा साहित्यिक वारसा नसताना अण्णाभाऊनी साहित्य प्रकार व प्रवाहांचे अनेक पर्वत उभे केले.

"ब्राम्हणांनी अण्णाभाऊ साठेसारख्या संवेदनशील, प्रतिभासंपन्न कलावंताला अक्षर ओळख न होऊ देण्याची व्यवस्था केली होती. पण या निरक्षरांनी अक्षर वाङ:मयाची निर्मिती करून मुलनिवासी बहूजन समाजाची अंगभूत क्षमता व गुणवत्ता सिध्द केली."2. प्रस्थापित व्यवस्थेने येथील संबंध बहूजन समाजाला शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर ठेवले. ज्ञानाची दारे कडीकुलपाने बंद केली. तरीही अण्णांनी आपल्या अंगभूत गुणांनी आपली प्रतिभा सिध्द केली. अनेक पदव्या प्राप्त् करून स्वत:चा गवगवा करणाऱ्या प्रस्थापित लेखकाच्या साहित्याला अण्णाच्या साहित्याची उंची गाठण्यात ते कमी पडले. पण अण्णाच्या साहित्याने व एकूणच कादंबरी वाड्:मयाने फार मोठी भरारी घेतली. तिचा पल्ला प्रस्थापित लेखकाला अजूनही पार करता आला नाही आणि म्हणूनच या संदर्भात वि.दा. करंदीकर म्हणतात," अनुकूल परिस्थीतीत अण्णाभाऊ साठे यांनी निर्माण केलेली साहित्यनिर्मिती समोरासमोर उभी टाकली की पृथ्वीच्या पोटात गडप व्हावे वाटते."3

अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील विचार हे तळागाळातल्या माणसाला जागृत करणारे आहेत. हजारो वर्षे अन्याय - अत्याचार सहन करणाऱ्या बहुजनांच्या हातात विचाराचे कोलीत देणारे लेखन अण्णाभाऊंनी केले. स्वातंत्र्य, समता आणि न्याय हा अण्णाभाऊंच्या साहित्याचा प्राण आहे आणि म्हणूनच त्यांनी बहूजन समाजाची होत असलेली परवड, उपेक्षा, अपमान, अवहेलना, शोषण, जुलूम, जबदरस्ती आदिनां नकार देणारा विचारच आपल्या साहित्यातून उजागर केला. यासाठी अवघ्या एकोणपन्नास वर्षात अण्णांनी 35 कादंबऱ्या, 13 कथासंग्रह, 13 लोकनाट्य, 3 नाटके अशी एकाहून एक सरस साहित्याची निर्मीती केली.

तसे पाहिले तर अण्णाभाऊ साठे यांचे कादंबरी क्षेत्रातील योगदान फार मोठे आहे आणि म्हणूनच मराठी साहित्याच्या प्रांतात एक यशस्वी कादंबरीकार म्हणून अण्णांची वेगळी ओळख आहे. झोपडपट्टीत कष्टमय जीवन जगणारा माणूस कामगार लोकांचे खडतर जीवन, गुन्हेगारी प्रवृत्ती, दलित समाजाचे भयावह जगणे, स्त्रियांचे नाना प्रश्न हे तर त्यांच्या कादंबरीत डोकावतातच, शिवाय स्वाभिमानी, पराक्रमी व वीर नायकांचे चित्रणही त्यांच्या कादंबरीत येताना दिसते. "फकीरा" 'वारणेचा' 'वाघ' 'मास्त्र' 'चित्रा' 'वैजयंता' 'चंदन' ' चिखलातील कमळ' ' फुलपाखरू' ' टिळा लाविते मी रक्ताचा' ' रत्ना' 'आवडी' अशा काही कादंबऱ्या वाचनीय ठरल्या आहेत. अण्णाभाऊंच्या एकूणच

कादंबरी वाड्:मयाचा विचार करता त्या माणसाला केंद्रस्थानी मानतात. दैववाद, कर्मकांड, अंधश्रध्दा, देव अशा निरर्थक जंजाळात त्या कधीच अडकत नाहीत. अण्णाभाऊंनी आपल्या कादंबऱ्यात भ्रामक कल्पनांना अजिबात थारा दिलेला नाही हे विशेष. या संदर्भात अण्णाभाऊच म्हणतात की, " जे साकार नाही त्याला आकार देण्याचं सामर्थ्य माझ्या ठायी नाही. जे पाहिल, अनुभवलं,ऐकंल तेच लिहिलं आहे". 4 अण्णाभाऊंच्या वाट्याला जे जीवन आले, त्यांनी जसे जगले ? भोगले तेच त्यांनी कादंबरीत चितारले. प्रस्थापित लेखकांसारख्या कल्पनेच्या भराऱ्या अण्णाभाऊंच्या कादंबरीत डोकावत नाहीत. तर त्यांनी जीवनातला अस्सलपणा मांडला. आपल्या सभोवतालचे जग त्यांनी उघड्या डोळ्यांनी पाहिले व ते जशास तसे मांडले. भूक आणि भाकरीसाठी तडफडणाऱ्या माणसांसाठी अण्णांनी आपली लेखणी झिजवली. तिला वैचारिक व वैज्ञानिक दृष्टीकोन प्राप्त करून दिला. शासनकर्ते व शोषणकरर्त्याचे पितळ अण्णांनी आपल्या साहित्यातून उघडे पाडले. आणि म्हणूनच अण्णाभाऊची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी आशावादी असल्याची दिसले. त्यांचा आपल्या कर्मावर अतिव विश्वास होता. समाजात त्यांना क्रांती हवी होती. अन्याय - अत्याचार व जुलमाचे वाडे त्यांना बेचिराख करायचे होते. म्हणूनच त्यांच्या कादंबरीतील नायक हे अन्यायाने खचून न जाता ते पेटून उठतात. जीवनाचे रडगाणे त्यांना जमत नाही, तर लढणे हाच त्यांचा स्थायिभाव असल्याचे दिसते. एवढेच नाही तर अण्णांच्या कादंबरीतील पात्रे ही वर्णाश्रमाची चौकट झुगारून देऊन समता परिवर्तनासाठी ती झुंजतात.

दलित - बहूजन समाजाचे चित्रण जसे अण्णाभाऊंच्या कादंबरीत येते, तसेच कामगार वर्गाचेही चित्रण अण्णाभाऊंनी रेखाटले आहे. 'चंदन' 'गुलाम' या कादंबऱ्या मालक व नोकर यांचे चित्रण करणाऱ्या आहेत. कामगार वर्गाचे होत असलेले शोषण या कादंबऱ्यामध्ये आले आहे. कर्जापायी माणसाला बैलागत राबावे लागते याचा प्रत्यय 'गुलाम' कादंबरीतून येतो. 'चंदन' कादंबरीही नोकर वर्गाच्या वाताहतीची करून कहाणी सांगणारी कादंबरी आहे. मालक - मजूर, कामगार, खोदकाम करणारे, दगड फोडणारे, माती काम करणारा मजूर वर्ग आदिंचे होत असलेले शोषण 'चंदन' मध्ये दृष्टीस पडते. पोटाची खळगी भरण्यासाठी नोकर वर्गाला हाडाचे काडं करावे लागतात. अन्याय सहन करावा लागतो आणि ते निमुटपणे सहन करतात. अशा या मजुर वर्गाच्या

अनंत व्यथा आणि वेदना, उपासमार त्यांच्या हालअपेष्टा आदिंचे चित्रण 'चंदन' या कांदबरीत आले आहे.

या देशातला शेतकरी, कामगार, कष्टकरी, दलित, श्रमिक व उपेक्षित वर्ग यांच्यात क्रांती झाली पाहिजे. यासाठी अण्णांची अहोरात्र धडपड होती. पर्यायाने अण्णांना आपल्या हाती लेखनी घ्यावी लागली. तिला वैचारिक बळ द्यावे लागले आणि अण्णांनी ते दिले. " दलित मणसाला तू जगाचा राजा असून तू जग बदलणारा क्रांती पुरूष आहेस. तूच या जगाचा निर्माता आणि पालनकर्ता आहेस असा संदेश देऊन अण्णाभाऊंनी श्रमिक माणसांना प्रतिष्ठा दिली."5. अशी संबंध बहूजन समाजाला 'स्व' ची जाणीव करून दिली. तसे पाहिले तर अण्णाभाऊ हे केवळ कादंबरीकारच नव्हते. तर ते साहित्याच्या सर्व क्षेत्रातील किर्तीसंपन्न साहित्यिक होते. अण्णांना समाजाच्या खालच्या स्तरापर्यंत क्रांती घडवायची होती. तो हेतू डोळ्यासमोर ठेवून अण्णांची लेखनी रात्र - दिवस झिजायची. तिला झिजणे माहिती होते कुजणे नाही. आज अण्णांच्या साहित्याला क्रांतीवादी साहित्य म्हटले जाते, ते त्याच अर्थाने. अण्णांभाऊ साठेंच्या कादंबरी वाड्:मयाने प्रस्थापितांच्या कादंबऱ्यांची मनोरंजनात्मक वाट झुगारून दिली आणि वास्तवतेला शब्दबद्ध केले. मानवी जिवनातले सत्य व स्वत्व अण्णांनी बेधडक व कुणाचाही मुलहीजा न बाळगता आपल्या साहित्यातून मांडले म्हणून आज त्यांचे साहित्य अमर झाले. परमोच्च शिखरावर पोहोचले. हा देश व आपले राज्य, इथला प्रत्येक माणूस सुखी व संपन्न झाला पाहिजे असे अण्णांचे स्वप्न् होते ते स्वप्न साक्षात उतरविण्यासाठी अण्णांनी झोपेचा त्याग केला व चोवीस तास हातात लेखनी घेतली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठेच एके ठिकाणी म्हणतात की, " माझा माझ्या देशावर, जनतेवर नि तिच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे. हा देश सुखी नि समृध्द व्हावा, इथं समानता नांदावी, या महाराष्ट्र भुमीचं नंदनवन व्हावं अशी मला रोज स्वप्न पडत असतात."6. संबंध देशच सुखी व समाधानी व्हावा ही अण्णांची प्रबळ इच्छा होती.

अण्णाभाऊंच्या कादंबरी विश्वातील समाजजीवनाचा विचार करता अण्णांनी 'चिखलातील कमळ' 'मुर्ती' 'आवडी' या सारख्या कादंबऱ्यातून स्त्री ही केवळ प्रेमासाठी असुसलेली नाही, तर ती वेळप्रसंगी बंडखोर बनताना दिसते. बंडाबरोबरच त्या अन्याय - अत्याचाराच्या विरोधात चवताळून उठतानादेखील दिसतात. एवढेच नव्हे तर अब्रु

रक्षणासाठी त्या अनेकदा पहाडासारख्या उभ्या राहतात. 'आवडी' कादंबरीतील नायिका हे याचेच धोतक आहे. पारंपारीक समाज व्यवस्थेला न जुमानता जातीअंताचा लढा लढणारी ही नायिका करारी बाण्याची आहे.

अण्णाभाऊंच्या कादंबरीतील स्त्रिया गरीब असल्या तरी त्या आपले शील व चारित्र्य आटोकाट जपण्याचा प्रयत्न करतात. दारिद्याचे कितीही ओढे- नाले वाहत असले तरी त्यांच्याशी त्या चिवटवपणे झुंज देतात. स्वत:चा नवरा व संसार यापलीकडचे तिला काहीही दिसत नाही. अन्याय - अत्याचाराच्या ओझ्याखाली दबलेली, परपुरूषाकडे आकर्षीत होणारी स्त्रीच अण्णांना नको होती. तर कर्तबगार व बाणेदार स्त्रीच त्यांनी आपल्या साहित्यातून पुढे आणली. तिचा शोशिकपणा व लवचिकपणा घालवुन तिला खंबीर बनविले आणि म्हणूनच अण्णांच्या कादंबरीतील स्त्री पारंपारिकतेच्या कोशातून बाहेर पडताना दिसते. प्रस्थापित धर्म व्यवस्थेने येथील स्त्रीला मानसिक गुलाम व दुर्बल बनविले होते. अण्णाभाऊंनी त्याच स्त्रीला बेडर, कणखर, स्वाभिमानी व कर्तबगार बनविण्याचे काम आपल्या कादंबऱ्यातून केले.

तसेच पाहिले तर, अण्णाभाऊंचे वास्तव्य मुंबईसारख्या महानगरात बराचकाळ व्यतीत झाले. याचे पडसाद त्यांच्या 'चित्रा' नावाच्या कादंबरीत उमटले आहे. रोजगाराच्या संधी म्हणून अख्या देशातून मुंबईत लोकांचे लोंढेच्या लोंढे वाहात असत, आजही वाहतात. परंतु तेथील जिवनमान पाहिले तर ते अतिशय भयावह असल्याचे त्यावेळच्या 'चित्रा' कादंबरीवरून आपल्या सहजच लक्ष्यात येते. बकाल, वस्त्या, पुरूषांची कामवासना, देहविक्री करणाऱ्या तरूणी हे सगळ काही वर्णन आपल्याला अस्वस्थ केल्याशिवाय राहत नाही. एकूणच अण्णांभाऊंच्या कादंबरी लेखनाचा अतिशय बारकाव्यानिशी विचार केला, तर त्यात तत्कालीन समाजजीवनाचे वस्तुनिष्ठ चित्रण येताना दिसते.

संदर्भ :-

1) डॉ. बजरंग कोरडे, 'भारतीय साहित्याचे निर्माते अण्णाभाऊ साठे' साहित्य अकादमी प्रकाशन, नवी दिल्ली- आवृत्ती 2013 पृ.1
2) प्रा. गौतम निकम 'क्रांतीकारी अण्णाभाऊ साठे' विमलकीर्ति प्रकाशन, चाळीसगाव - प्रथमावृत्ती - 2011 पृ.25
3) तत्रैव पृ.25

4) संपादक डॉ. रमेश कदम 'साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे व्यक्तीत्व, साहित्य आणि तत्वज्ञान' आवृत्ती 2019 पृ.106
5) डॉ. माधव बसवंते 'मातंग समाज इतिहास आणि वास्तव' इसाप प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती- 2010 पृ.128
6) डॉ. सुरेश चौथाईवाले 'मातंग चळवळीचा इतिहास' लहुजी प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती- 2016 पृ.55

*******